यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

## अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार आपल्या विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने सामाजिक न्याय दिनानिमित्त खालील तपशिलाप्रमाणे (झूम प्लटफॉर्मद्वारे) ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

**विषय** : "राजर्षि शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे प्रणेते"

**व्याख्याते** : डॉ. प्रकाश पवार, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

**दिनांक** : २६ जून २०२५

**वेळ** : दुपारी २.३० वा.

सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी, शैक्षणिक सल्लागार, शैक्षणिक संयोजक, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी खालील क्यूआर कोड स्कॅन करून सदर व्याख्यानात सहभागी व्हावे, ही विनंती.

झूम मिटिंग आयडी : 861 5369 4995

पासकोड : ycmou

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगा घरोघरी, नाशिक-४२२ २२२

कुलसचिव

**प्रत – माहितीसाठी व उचित कार्यवाहीस्तव**

१. मा. कुलगुरू यांचे कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय
३. सर्व विद्याशाखा संचालक /विभाग प्रमुख/ केंद्र प्रमुख/ कक्ष प्रमुखांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणून द्यावे.
४. सर्व मा. वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्र – अमरावती / छत्रपती संभाजीनगर / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे / कोल्हापूर / नांदेड यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले सर्व अभ्यासकेंद्र व विद्यार्थी यांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई–मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : २७/०६/२०२५

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

## राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त विशेष व्याख्यान अहवाल

**विषय : राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे प्रणेते**

**वक्ते : प्रा. डॉ. प्रकाश पवार, उपप्राचार्य तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे**

**दिनांक : २६/०६/२०२५, वेळ. दु .२.०० वा.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने दि.२६ जून २०२५ रोजी दुपारी २.०० वा. राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त 'राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे प्रणेते' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या विशेष व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते प्रा.डॉ. प्रकाश पवार, उपप्राचार्य तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख तथा मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर होते. याप्रसंगी त्यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय, प्रास्ताविक तथा व्याख्यान आयोजन करण्यामागची भूमिका विषद केली.

यावेळी व्याख्यानात डॉ. पवार यांनी 'राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे प्रणेते' या विषयाच्या अनुषंगाने त्यांच्या व्याख्यानात शाहू महाराजांची कल्याणकारी राज्याची भूमिका, उदारमतवादी व लोकशाही मुल्यांचा प्रभाव शाहू महाराजांवर होता, याबाबत सविस्तर विश्लेषण केले. शाहू महाराजांनी जातिनिर्मूलन जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही, असे सांगून जातिनिर्मूलनाची व अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ कोल्हापूर संस्थानापासून सुरु केली. महिला सक्षमीकरण, महिला संरक्षण कायदे, देवदासी प्रथा निर्मुलन, बालविवाह प्रथा प्रतिबंध याबाबत कार्य केले. तसेच विधवा पुनर्विवाहाला चालना दिली. वसतिगृहांची निर्मिती करून शिक्षण हे मोफत व सक्तीचे केले. आरक्षण हा सामाजिक न्यायाचा आधार मानून त्यांनी सामाजिक न्यायाची मुहूर्तमेढ रोवली, असे डॉ. पवार यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. तसेच व्याख्यानाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली.

सदर व्याख्यानास विद्यापीठातील शैक्षणिक संयोजक आणि बहुसंख्य विद्यार्थी ऑनलाईन माध्यमातून उपस्थित होते. या व्याख्यानाकरिता डॉ. विशाल आंबेडकर व धम्मरत्न जावळे यांनी तांत्रिक सहाय्य केले, तर विद्याशाखेतील सर्व शैक्षणिक संयोजक यांनी सदर व्याख्यानाचे नियोजन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख तथा मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी अध्यक्षीय समारोप करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले. सदर व्याख्यानासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंग बिसेन, कुलसचिव दिलीप भरड यांचे मार्गदर्शन लाभले.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक *

28/06/2025

प्रा. नागार्जुन वाडेकर
प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन




राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त विशेष व्याख्यानामध्ये ऑनलाईन माध्यमातून बोलतांना प्रा. डॉ. प्रकाश पवार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख प्रा.नागार्जुन वाडेकर उपस्थित होते.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक

सकाळ YCMOU PRO SK S4 30.06.25

# मुक्त विद्यापीठात डॉ. पवार यांचे मार्गदर्शन

**नाशिक, ता. २९ :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज जयंती, सामाजिक न्याय दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश पवार यांचे 'राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे प्रणेते' विषयावर ऑनलाइन व्याख्यान झाले.

डॉ. पवार म्हणाले, की राजर्षी शाहू महाराज यांच्या ४८ वर्षांच्या जीवनमानाचा कालावधी भारताच्या राजकीय व सामाजिक स्थित्यंतराचा काळ होता. त्या काळातील फुले- शाहू- आंबेडकर या सामाजिक बदलाच्या त्रिसूत्रीचे ते मध्यबिंदू आणि आधारस्तंभ ठरले. आपल्या निर्णय कार्यातून भारतातील आरक्षण पद्धतीला दिशा दिली. अस्पृश्यता व जात व्यवस्था निर्मुलन, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास प्रोत्साहन, बालविवाह विरोध, पुनर्विवाह व विधवा विवाहास मान्यता, शिक्षणाचा प्रचार व प्रसार, बोर्डिंग शाळांचे जनकत्व, देवदासी प्रथा निर्मुलन, राधानगरी धरणाच्या निर्मितीतून नैसर्गिक साधन संपत्तीचे योग्य व्यवस्थापन यासारख्या विविध प्रकारच्या कार्यातून ते अजरामर झाले. विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक नागार्जुन वाडेकर यांनी व्याख्यानाचे समन्वय व संयोजन केले.

Nashik, Nashik-Today
30/06/2025 Page No. 4

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक *